आपत्कालीन पीक नियोजन, खरीप २०११

राज्याची १ जुन ते दि. ४ जुलै अखेर दैनंदिन पावसाची सरासरी २७२.५ मि.मी. असुन २२६.८ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत ८३.२ टक्के पाऊस झाला. मात्र कोकण व कोल्हापूर विभाग वगळता या कालावधीत राज्यात सर्वत्र अत्यंत कमी पाऊस झाला आहे. कमी पावसामुळे राज्यात सरासरी क्षेत्राच्या (१३२.३४ लाख हेक्टर) तुलनेत दि. ४ जुलै अखेर एकूण २१ टक्के (२८.२६ लाख हेक्टर) पेरणी झालेली आहे.

राज्यामध्ये पडलेला पाऊस व खरीप हंगामातील सरासरी क्षेत्राच्या २१ टक्के पेरणी लक्षात घेता अशीच परिस्थिती पुढे उद्‌भवल्यास राज्याचा आपत्कालीन पीक नियोजन आराखडा तयार करण्यात आला असून यापुढे पावसाचा खंड पडल्यास कोणती पिके घ्यावीत याबाबत राज्यातील कृषि विद्यापीठाच्या शिफारशी लक्षात घेता खालीलप्रमाणे आपत्कालीन पीक नियोजन करण्यात आले आहे.

विभागवार आपत्कालीन पर्यायी पिक नियोजन

अ. क्र.	पेरणी योग्य पावसाचा आगमन कालावधी	विभाग	कोणती पिके घ्यावीत	कोणती पिके घेऊ नयेत
१	८ जुलै ते १५ जुलै	प.महाराष्ट्र/ खानदेश	बाजरी, राळा, भुईमूग, एरंडी, तूर, हुलगा इत्यादी पिके	-
		मराठवाडा	कापूस, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, तूर, तीळ व सुर्यफुल	भुईमूग, मूग व उडीद
		विदर्भ	मुग सोयाबीन, उडीद इत्यादी पिकाचा आंतरपिकात समावेश करावा.	
२	१५ जुलै ते ३१ जुलै	प.महाराष्ट्र/ खानदेश	सुर्यफुल, राळा, एरंडी, तूर, हुलगा इत्यादी पिके व आंतरपिके	भुईमूग, बाजरी
		मराठवाडा	बाजरी, सुर्यफुल, सोयाबीन, एरंडी, तूर, तीळ इत्यादी पिके व आंतरपिके	कापूस, ज्वारी आणि भुईमूग
		विदर्भ	सोयाबीन, तूर इत्यादी पिकाचा आंतरपिकात समावेश करावा. सुधारीत वाणाचा वापर करावा.	ज्वारी, मूग व उडीद, शक्यतो संकरित वाणाचा वापर करु नये.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये खालील प्रमाणे उपाययोजना करणेच्या शिफारशी आहेत.

१) साधारणतः २० ते २५ टक्के अधिक बियाण्यांचा वापर करावा.

२) रासायनिक खतांच्या वापरात किमान २५ टक्के कपात करावी.

३) संकरीत वाणाखालील क्षेत्र कमी करून सरळ,सुधारीत वाणांचा अधिक प्रमाणात वापर करावा

४) पेरणी करतांना बिजप्रकीया केलेले बियाणे वापरावे

५) **आपत्कालीन पीकनियोजनात शक्यतोवर आंतरपीक पध्दतीचा वापर करावा.**

६) ज्वारीवर खोड माशी / खोड पोखरणारी अळी यांचा संभाव्य प्रादुर्भाव लक्षात घेता वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच प्रादुर्भाव दिसून येताच शिफारशीप्रमाणे त्वरीत उपाययोजना हाती घ्याव्यात.